महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०९ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### बंडखोरी - पक्षशिस्त की कार्यकर्त्यांचा उद्रेक?

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात बंडखोरी हा शब्द पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. उमेदवारी नाकारली म्हणून पक्षाविरोधात उभे राहणारे कार्यकर्ते, माजी नगरसेवक आणि पदाधिकारी ही आज जवळपास प्रत्येक पक्षाची डोकेदुखी बनली आहे. प्रश्न असा आहे की ही बंडखोरी म्हणजे पक्षशिस्तीचा भंग आहे, की अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या कार्यकर्त्यांचा नैसर्गिक उद्रेक? राजकीय पक्ष लोकशाहीची शाळा मानले जातात. मात्र उमेदवारी वाटपाच्या वेळी हीच लोकशाही सर्वाधिक गहाळ झाल्याचे दिसते. तळागाळात काम करणारा कार्यकर्ता, निवडणुकीच्या वेळी केवळ प्रचारापुरता आठवतो आणि निर्णय मात्र वरच्या पातळीवर बंद खोलीत घेतले जातात. अशा परिस्थितीत नाराजी निर्माण होणे स्वाभाविक ठरते. पक्षशिस्त ही कोणत्याही संघटनेची गरज असते. शिस्त नसेल तर पक्ष विस्कळीत होतो, हे वास्तव आहे. मात्र शिस्त म्हणजे आंधळे आज्ञापालन नव्हे. सातत्याने डावलले जाणारे, संधी नाकारले जाणारे कार्यकर्ते शेवटी बंडाचा मार्ग स्वीकारतात, तेव्हा त्यामागे वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा अस्मितेचा प्रश्न अधिक असतो. आज अनेक पक्ष बंडखोरीला फक्त निलंबन, हकालपट्टी किंवा कारवाईच्या चष्म्यातून पाहताना दिसतात.

पण प्रश्न असा आहे की बंडखोरी निर्माणच का होते, याचा आत्मपरीक्षणात्मक विचार किती पक्ष करतात? उमेदवारी प्रक्रियेत पारदर्शकता, स्थानिक मतांचा सन्मान आणि कार्यकर्त्यांशी संवाद असता, तर बंडखोरीचे प्रमाण निश्चितच कमी झाले असते. दुसरीकडे, काही ठिकाणी बंडखोरी ही वैचारिक नसून निव्वळ संधीसाधूपणातून जन्माला येते, हेही नाकारता येणार नाही. दुसऱ्या पक्षांचा अप्रत्यक्ष पाठिंबा, वैयक्तिक विजयाची हाव आणि सत्तेची समीकरणे यातूनही बंडखोरीला खतपाणी मिळते. अशा वेळी पक्षशिस्तीची गरज अधोरेखित होते. म्हणूनच बंडखोरीकडे एकांगी न पाहता समतोल दृष्टीकोन आवश्यक आहे. पक्षशिस्त आणि कार्यकर्त्यांचा सन्मान या दोन्हींचा सुवर्णमध्य साधल्याशिवाय ही समस्या सुटणार नाही. अन्यथा, आज बंडखोरी जी स्थानिक पातळीवर दिसते आहे, ती उद्या पक्षांच्या अस्तित्वालाच प्रश्नचिन्ह लावणारी ठरू शकते. थोडक्यात सांगायचे तर, बंडखोरी ही केवळ शिस्तभंगाची समस्या नसून, पक्षांतर्गत लोकशाहीच्या अपयशाचे लक्षण आहे.

# एमएमआरमधील दहा आरएमसी प्लांट बंद



## प्रदूषण नियंत्रण मंडळाचा दणका | कल्याण, अंबरनाथ, भिंवडी, दहीसरमधील कारखान्यांचा समावेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई महानगर क्षेत्रामध्ये वायूप्रदूषण संबंधित नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई केली असून एकूण १० रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्लांट बंद केले आहेत. तर एकूण ८४ लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे. मुंबई महानगर क्षेत्रामध्ये हवा प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी तसेच नियमांची काटेकोर अंमलबाजावणी व्हावी यासाठी एमपीसीबीकडून आरएमसी प्लांटचे आणि बांधकाम सुरु असणाऱ्या प्रकल्पांचे सर्वेक्षण करण्यासाठी भरारी पथक नेमण्यात आले आहे. या पथकाकडून मागील दोन दिवसात ४४ आरएमसी प्लांटची तपासणी करण्यात आली होती. यावेळी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या स्वामीनारायण लाईफस्पेस एल. एल. पी. डोबिंवली, मे. जे. आर. बी. इंन्फ्रास्टक्चर प्रा. लि. (कल्याण), श्रीराम इंटरप्रायजेस (टेंबघर, अंबरनाथ), प्रिझम जॉनसन लि. (भिंवडी), एल. ॲण्ड टी. (भिंवडी), कृष्णा कन्सट्रक्शान्स् (दहीसर मोरी), प्रकाश इंजिनियरर्स ॲण्ड इन्फ्रा प्रोजेक्टस् (तुर्भे), ए. पी. कन्सट्रक्शान्स् (तुर्भे), गजानन साईदत्त ॲसोसिएटस् (विरार), आर. डी. एस. प्रोजेक्ट (वरळी) या १० प्लांटवर बंदची कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील १७ आरएमसी प्लांटला प्रास्तावित आदेश देत ८४ लाख दंड वसुल करण्यात आला आहे. त्यात कल्याण येथील ९, नवी मुंबईतील १ आणि रायगड येथील ७ प्लांटचा समावेश आहे. तसेच चार प्लांटला मंडळाकडून अंतरीम निर्देश देण्यात आले आहेत. बांधकाम सुरु असणाऱ्या एकूण २९ मोठया प्रकल्पांची तपासणी भरारी पथकाकडून करण्यात आली पैकी ५ प्रस्तावित प्रकल्पांना अंतिम निर्देश देण्यात आले आहेत. डिसेंबर महिन्यापासून आतापर्यंत एकूण २४० आरएमसी प्लांटची तपासणी करण्यात आली असून एकूण ४ कोटी ३५ लाख इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

## कॉंग्रेसच्या 12 नगरसेवकांचा अखेर भाजपात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे - राज्यात २९ महापालिकांच्या निवडणूकांसाठी मतदान १५ जानेवारी रोजी पार पडणार आहे. या सर्व महापालिकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचाच महापौर बसेल यात काही शंका नाही, असा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.**

अंबरनाथ नगर परिषदेत निवडून आलेल्या कॉंग्रेसच्या १२ नगरसेवकांनी भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे त्या नगरसेवकांच्या निलंबनाची कारवाई कॉंग्रेस पक्षाने केली होती. त्यानंतर, गुरुवारी नवी मुंबई येथे भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत या नगरसेवकांनी भाजप पक्षात प्रवेश केला. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'या सर्व नगरसेवकांशी आम्ही आधी चर्चा केली. या चर्चेतून असे समोर आले की, प्रत्येक जण निवडणुकीला ज्यावेळेला उभा राहतो. तेव्हा जिंकण्यासाठी उभा राहत असतो आणि त्या भागातील नागरिकांना ज्या नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्या यासाठी तो नेहमीच प्रयत्न करत असतो. त्यामुळे त्यांच्या भागांमध्ये विकासात्मक काम होण अपेक्षित आहे. म्हणून हे सर्व नगरसेवक आमच्याकडे आली आहेत, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.



### सर्वांना कोर्टात खेचू - कॉंग्रेस प्रवक्ते सचिन सावंत

**दरम्यान, अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी भाजपमध्ये केलेला प्रवेश हा पूर्णपणे बेकायदेशीर आहे. या सर्व नगरसेवकांचे नगरपालिका सदस्यत्व रद्द करण्यासाठी कॉंग्रेस पक्ष कायदेशीर कारवाई करणार असल्याची माहिती प्रदेश कॉंग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी दिली.**

## जिल्ह्यातील ग्रामीण महिलांना 'लखपती दीदी' बनवा – सीईओ रणजित यादव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे दि. 8/** ठाणे जिल्हा परिषदेत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभिदwयान (उमेद) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या बैठकीत ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि बचत गटांच्या माध्यमातून शाश्वत उपजीविका उभारण्यावर भर देण्याच्या सूचना सीईओ यांनी दिल्या. जिल्ह्यात 'लखपती दीदी' उपक्रमाअंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४५,८४४ उद्दिष्टांपैकी ४७,७३२ महिलांनी उद्दिष्ट पूर्ण केले आहे. चालू आर्थिक वर्षात डिसेंबर २०२५ अखेर ७,२५२ महिला लखपती झाल्या असून आतापर्यंत ठाणे जिल्ह्यात एकूण ५४,३८३ महिला 'लखपती दीदी' झाल्या आहेत. बैठकीत उपजीविका वृद्धी, बँक पतपुरवठा, उद्योग, विपणन व विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. सर्व तालुक्यांनी समन्वयाने काम करून उद्दिष्टपूर्ती साध्य करावी, असे निर्देश देण्यात आले.




> "उमेद अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण हा आमचा मुख्य उद्देश आहे. यासाठी सर्व तालुक्यांनी समन्वयाने काम करून 'लखपती दीदी' उपक्रम प्रभावीपणे राबवावा, याबाबत संबंधीतांना निर्देश दिले आहेत"
> — रणजित यादव, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे




## महत्वाचे

### पेड न्यूजवर निवडणूक आयोगाचे लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता.८ (बातमीदार):**

मिरा-भाईंदर पालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांनी पेड न्यूजच्या माध्यमातून स्वतःचा प्रचार करु नये, याकडे निवडणूक आयोगाचे बारिक लक्ष असणार आहे. अशा बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी एक समिती गठित केली आहे. निवडणुकीनिमित्त आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी आयोगाकडून विविध प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमांवरील जाहिरांतीवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. यासाठी महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. पोलिस उपायुक्त अशोक विरकर, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ संभाजी पानपट्टे, उपायुक्त प्रणाली घोंगे व जनसंपर्क अधिकारी राज घरत समितीचे सदस्य आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणन करणे, पेड न्यूज संदभातील तक्रारींचे निराकारण करणे त्याचप्रमाणे विविध प्रसारमाध्यमातील वृत्तांकनाच्या संकेताच्या पालनाबाबत ही समिती देखरेख करणार आहे.

### राज ठाकरे कल्याणमध्ये मनसे उमेदवारांच्या भेटीला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील पूर्ण ताकदीने उतरली असून मनसेच्या उमेदवारांना भेट देण्याकरीता आणि मनसे पदाधिकारी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज कल्याणमध्ये धावती भेट दिली. यावेळी राज ठाकरे यांच्या हस्ते कल्याण पश्चिमेतील मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार उल्हास भोईर, रेखा भोईर यांच्या निवडणूक मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर कल्याण पश्चिमेतील पॅनल क्रमांक 7 चे मनसे उमेदवार ॲड. नयना प्रकाश भोईर आणि गणेश लांडगे यांच्या निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पहायला मिळाली. तर राज ठाकरे उमेदवारांच्या भेटीला आल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांचा विजय पक्का असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## "महापालिका निवडणुकीनंतर मोठा राजकीय स्फोट?

### दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्र येण्यावर अजितदादांचे सूचक वक्तव्य !

**महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या घडामोडींची चाहूल लागली आहे. दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एकत्र येण्याच्या अटकळींनी जोर धरलेला असतानाच, महापालिका निवडणुकांनंतर शरद पवार भाजपप्रणीत NDA सोबत जातील, असा दावा राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींनी केलेल्या युतीमुळे या चर्चांना अधिकच हवा मिळाली आहे. त्यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत या विषयावर सूचक भाष्य केल्याने राजकीय वातावरण तापले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या हालचालींचे संकेत मिळू लागले आहेत. दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येणार की नाही, या प्रश्नावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूचक आणि महत्त्वाचे विधान केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अजित पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत मोठे संकेत दिले असून "राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो. परिस्थिती आणि वेळेनुसार निर्णय घेतले जातात," असे सूचक विधान त्यांनी केले. बजेट आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादींबाबत भूमिका स्पष्ट केली जाईल, असे सांगत अजित पवार यांनी राजकीय दिशाही काळानुसार बदलत असल्याचे संकेत दिले. युती आणि आघाडीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, ९० नंतर कधीच एकाच पक्षाचे सरकार आलेले नाही. लोकसभा-विधानसभा निवडणुकांमध्ये आघाडी असते, मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यकर्त्यांना मुभा दिली जाते. भौगोलिक आणि स्थानिक परिस्थिती पाहून विविध ठिकाणी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या वेगवेगळया युती झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.






# नागरिकांनी मतदान करून हक्क बजवावा - आयुक्त अभिनव गोयल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गुरुवार दि.15 जानेवारी रोजी नागरीकांनी मतदान करुन, आपला मतदानाचा अधिकार बजवावा, असे आवाहन कल्याण डोंबिवली महापालिका निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अभिनव गोयल यांनी आज स्थायी समिती सभागृहात संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेसमयी केले. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त योगेश गोडसे, कल्याण परिमंडळ-3 चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे, निवडणूक विभागाचे उपआयुक्त समीर भुमकर, आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीचे समन्वय अधिकारी बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते.

या सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी एकुण 1548 मतदान केंद्र असून, एकुण 9 ठिकाणी स्ट्राँगरुमची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी क्र.1 ते 9 यांच्या अधिनस्त असलेल्या निवडणूक प्रक्रियेची मतमोजणी एकुण 8 ठिकाणी होणार आहे. महापालिकेने मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रदर्शित केलेली आहे. तसेच एकुण 1182 मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत वोटर स्लीपचे वितरण करण्यात येणार आहे.

महापालिका निवडणूकीसाठी पूर्णपणे सज्ज असून, या निवडणूकीसाठी एकुण 170 झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 1 CU आणि उमेदवारांच्या संख्येनुसार BU उपलब्ध करुन दिले जाणार आहेत, मतदान केंद्रामध्ये नागरीकांना आपले मोबाईल फोन नेण्यास मनाई आहे, अशी माहिती महापालिका निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी दिली.कल्याण परिमंडळ-3 चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांनी मतदान व मतमोजणीदिवशी पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या तयारीची, बंदोबस्ताची माहिती विषद केली. त्याचप्रमाणे मतदानापूर्वी ,मतदानाचे दिवशी व मतमोजणीचे दिवशी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात राहील अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली.

# बोरीवलीत विकासकामांचा वेग | ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत आलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील बोरीवली ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन सुरू असलेल्या विविध विकासकामांमुळे नागरीकांच्यात समाधान व्यक्त होत आहे.

ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या विकासकामांमुळे परिसरातील नागरी सुविधा सुधारण्यास मदत होत असून बोरीवली ग्रामपंचायत हद्दीत ग्रामफंडातुन विविध ठिकाणी रस्त्यांची दुरुस्ती, काही भागांत नवीन सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांचे बांधकाम, समतानगर, नवी वस्ती बोरीवली या भागांत जुन्या व मोडकळीस आलेल्या गटारांची दुरुस्ती व नवीन बांधकाम करून गटारे बंदीस्त करण्यात येत आहेत. पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने बोरिवली गावातील विविध ठिकाणी नवीन बोरवेल खोदण्याचे काम सुरू असून, त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होण्यास मदत होईल तसेच आनंदनगर येथील जिल्हा परिषद मराठी शाळेसाठी संरक्षण भिंत बांधकाम, क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी बोरीवली फुटबॉल मैदानावर खेळाडूंसाठी पॅव्हिलियन उभारण्यात आले याचबरोबर समतानगर येथे नागरिकांसाठी बसण्यासाठी बाकडे बसविण्यात आले आहेत. स्वच्छता व रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेच्या दृष्टीने ग्रामपंचायत हद्दीतील विविध भागांत नियमित स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, विवीध ठिकाणी नवीन पथदिवे बसविण्यात आले. अशी विविध विकासकामे जोमाने सुरू असुन सदर विकासकामे बोरीवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर पिंजारी, ग्रामपंचायत कमीटी व ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, बोरीवलीत विकासकामे व्हावीत यासाठी सामाजिक कार्यकर्ते अँड .जियाद सोहराब गुजर हे पाठपुरावा करीत असुन त्यांच्या प्रयत्नाने विविध विकास कामांना गती मिळत आहे. गावातील विविध नागरी समस्या सोडविण्यासाठी बोरीवली ग्रामपंचायत पुढाकार घेत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# एमआयडीसी निवासीत आरोग्याचा प्रश्न गंभीर

## नाला कचरा, प्लास्टिकने भरला त्यात सांडपाणी वाहिनी फुटली



दै.ठाणेजीवनदीपवार्ता

**कल्याण** : डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये एक नाही अनेक प्रश्न गंभीर स्वरूपात उभे टाकले आहेत. जागनाथ सुपर मार्केट समोर मुख्य रस्त्याचा कडेला असलेल्या नाल्यात कचऱ्याचा आणि प्लास्टिकचा थर जमा झाला असून त्यातून कसल्यातरी पाण्याचा बुडबुडा, फवारा येऊन त्यात मिसळत असल्याचे दिसत आहे. ही बाब गेल्या कित्तेक दिवसांपासून सुरु असून या रस्त्यावरून रोजच प्रशासनाचे अधिकारी, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते जात असतात. या नाल्याची साफसफाई करून त्यातून येणारा पाण्याचा फवारा हा कसला आहे हे शोधून पाहण्याची कोणालाच आवश्यकता भासत नाही. याच नाल्याचा कडेला अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान बसाविले असून त्यांचा कचरा पण याच नाल्यात पडत असावा. याच फेरीवाल्यांचे कोणीतरी आधारस्तंभ असावेत त्यामुळे त्यांनाही हटविले जात नाही. आता सर्व लोकही उदासीन झाले असल्याचे दिसत असून आपले काम भले बाकी काही होवो. अशी जनतेची परिस्थिती निर्माण झाली आहे. एमआयडीसी आणि केडीएमसी प्रशासन हे एकमेकांकडे बोट दाखवून फक्त नोटीस देण्यापलीकडे काहीही करीत नाही. महापालिकेच्या निवडणुकीनंतर लोकनियुक्त प्रशासन येऊन काही सुधारणा होतात की नाही ते पाहावे लागेल.

## जाहिर नोटीस

या नोटिसीद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की मुरबाड नगरपंचायत हद्दीतील शेळकेपाडा मधिल मालमत्ता क्रमांक 1297 ही मधुकर पांडुरंग विशे यांच्या नावे नगरपंचायत दप्तरी नोंद आहे. परंतु सदर मालमत्ता आता त्यांची पत्नी श्रीमती मनिषा मधुकर विशे यांच्या नावे नगरपंचायत दप्तरी नोंद करावयाचे आहे.

तरी सदर मिळकतीस या व्यतिरिक्त अन्य कोणाला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी आजपासून म्हणजे नोटिस निघाल्या पासून ७ दिवसांच्या आत हरकत घ्यावी. त्यानंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

महाराष्ट्र नगर पंचायत / नगरपरिषद औद्योगिक नगरी अधिनियम 1965चे कलम 130 अन्वये सदर मिळकत माझे नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आपली**
**मनिषा मधुकर विशे**

# शिवसेना उमेदवारासाठी ठाकरे गटाचा बिनशर्त पाठिंबा जाहीर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवलीतून आणखी एक मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. मतदानाला अवघा आठवडा उरला असतानाच उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवाराने थेट शिवसेनेच्या उमेदवाराला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे शिवसेनेच्या खात्यामध्ये आणखी एक बिनविरोध उमेदवार निवडून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यानिमित्ताने केडीएमसी निवडणुकीतील खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या आणखी एक मास्टरस्ट्रोकची चर्चा रंगली आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला हा मोठा धक्का समजला जात आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील पॅनेल क्रमांक ३० (ड) मधील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार रामचंद्र गणपत माने उर्फ भीमा हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ पॅनल क्र ३० च्या (ड) मधून अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवत होते. त्यांनी आपला संपूर्ण पाठिंबा त्यांच्यासमोर निवडणूक लढणारे शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुन बाबू पाटील ह्यांना आणि पॅनल क्रमांक ३० मधील शिवसेनेच्या उमेदवारांना जाहीर केला आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे ह्यांच्या उपस्थितीत त्यांनी डोंबिवली निवासस्थानी शिवसेनेमध्ये प्रवेश करत आपल्या पाठींब्याचे पत्र दिल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे केडीएमसीतील शिवसेनेच्या खात्यात आणखी एका बिनविरोध उमेदवाराची भर पडल्याची चर्चा आहे.तर रामचंद्र गणपत माने उर्फ भीमा यांनी केलेल्या शिवसेना पक्ष प्रवेशावेळी सचिव भाऊसाहेब चौधरी, आमदार राजेश मोरे, भाजपा जिल्हाप्रमुख नंदकिशोर परब, निवडणूक प्रचार प्रमुख नाना सूर्यवंशी, ज्येष्ठ नगरसेवक रमेश म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, उमेदवार अर्जुन पाटील, सचिन पोटे, ओम लोके, सागर जेधे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. पॅनल क्रमांक 30 मधील डॉ. मनोज पाटील ह्यांनी अर्जुन पाटील ह्यांना पाठिंबा दिला असून अर्जुन पाटील ह्यांच्या समोर एकही उमेदवार निवडणूक लढण्यास नसून जे दोघे होते त्यांनीही बिनशर्त पाठिंबा दिल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. त्यामुळे खासदार डॉ श्रीकांत शिंदे ह्यांच्या यशस्वी नेतृत्वात ही लढत शिवसेनेसाठी ह्या पॅनलमध्ये एकतर्फी झाल्याची चर्चा रंगली आहे.

# ओएनजीसीचा समाजाभिमुख उपक्रम

## शाळांना डिजिटल बोर्ड, दिव्यांगांना निओमोशन गाड्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी), युनिट उरण यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात येणाऱ्या सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांसाठी 'डिजिटल चॅनल बोर्ड'चे वितरण व उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. याच कार्यक्रमात उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आई फाऊंडेशनच्या सहकार्याने दहा दिव्यांगांना झोमॅटो फूड डिलिव्हरीच्या माध्यमातून उदरनिर्वाह करता यावा, यासाठी निओमोशन गाड्यांचे वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम उरण येथील जी.ई.आर. एस. इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूल, विमला तलाव परिसर येथे आयोजित करण्यात आला होता.

ग्रामीण व गरजू भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी, आकर्षक व संवादात्मक व्हावी, या उद्देशाने ओएनजीसीकडून डिजिटल चॅनल बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत गुणात्मक सुधारणा होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. तसेच दिव्यांग बांधवांना सन्मानाने व स्वबळावर उदरनिर्वाह करता यावा, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने देण्यात आलेल्या निओमोशन गाड्यांमुळे दिव्यांग व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील, तसेच दिव्यांगांप्रती समाजात सकारात्मक व आपुलकीची भावना निर्माण होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी संजिव मोहन (सपोर्ट मॅनेजर, ओएनजीसी), उमेश नांदगावकर, भावना आठवले, अनिल कांबळे, श्याम पाटेकर, अभिजीत, महेश म्हात्रे (चेअरमन, उरण हायस्कूल) यांच्यासह निओमोशन गाड्यांचे लाभार्थी व त्यांचे कुटुंबीय, शाळेचे विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद, आई फाउंडेशनचे अध्यक्ष मदन पाटील तसेच सर्व पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) यांनी केले असून सह-आयोजन जनजागृती व समाज प्रबोधन कार्य समिती यांच्या सहकार्याने करण्यात आले. शिक्षण आणि समाजकल्याणाच्या क्षेत्रात तंत्रज्ञान व रोजगाराच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवून आणणारा ओएनजीसीचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# भारतीय समाज उन्नती मंडळाला आदर्श संस्था पुरस्कार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : दि. 8 डिसेंबर

भिवंडी येथील प्रसिद्ध शिक्षण संस्था पद्मश्री आण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी या संस्थेला महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने नुकतेच 2026 चा आदर्श संस्था पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रात अविरत ज्ञानदानाचे कार्य केल्याबद्दल कोंकण शिक्षक मतदार संघाचे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत व आ. डॉ बालाजी किणीकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेच्या वतीने सरचिटणीस जी आर पाटील यांनी स्वीकारला यावेळी संस्थेतील शिक्षक स्वप्नील पाटील, मा. मुख्याध्यापक एल आर पाटील, एन एम भामरे उपस्थित होते. या सन्मानाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. विजय जाधव म्हणाले की, संस्थेसाठी हा आदर्श संस्था पुरस्कार मिळणे अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे. पद्मश्री अण्णासाहेब जाधव यांनी शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये या उद्देशातून या संस्थेची स्थापना केली होती. त्यांच्या कार्याची, विचाराची प्रेरणा घेऊन आम्ही शिक्षण क्षेत्रात सातत्याने कार्यशील आहोत. हा पुरस्कार संस्थेच्या पुढील कार्यासाठी अधिक प्रेरणा देईल. अशी भावना व्यक्त करत महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे आभार मानले.

या सन्मानाबद्दल कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे, सरचिटणीस आर.एन. पिंजारी, अँड. रोहित जाधव, उपाध्यक्ष श्रीराम भोईर, प्र. प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर, रजिस्ट्रार नरेश शिरसाळे, मुख्याध्यापक सुधीर घागस यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मयोगी यांनी अभिनंदन केले.

# रिक्षा स्क्रॅप आता मोटार वाहन निरीक्षकांच्या समक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : ऑटो रिक्षा स्क्रॅप प्रक्रियेत होत असलेले गैरप्रकार रोखण्यासाठी कल्याण आरटीओने कडक कार्यपद्धती लागू केली आहे. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या (एमएमआरटीए) २०१५ च्या ठरावानुसार रिक्षा स्क्रॅप करण्याची निश्चित प्रक्रिया असतानाही काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी यासंदर्भात परिपत्रक जारी केले आहे. या नव्या आदेशानुसार यापुढे ऑटो रिक्षा स्क्रॅप करण्याची सर्व प्रक्रिया मोटार वाहन निरीक्षकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत आणि आरटीओ कार्यालयाच्या आवारातच पार पडणार आहे. रिक्षा मालकाने विहित नमुन्यात अर्ज सादर करणे, सीएनजी बाटली काढणे, वाहनाची तपासणी करून स्क्रॅपची कार्यवाही करणे, तसेच त्याचे छायाचित्र व आवश्यक नोंदी कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच भंगार विक्रेत्याचा वजनकाटा प्रमाणित असणे आवश्यक असून स्क्रॅप वाहनाच्या भंगाराची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी वाहन मालकावर देण्यात आली आहे. स्क्रॅपची संपूर्ण नोंद वाहन ४.० संगणक प्रणालीवर करण्याच्या स्पष्ट सूचनाही देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे रिक्षा स्क्रॅप प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून गैरप्रकारांना आळा बसणार असल्याचे आरटीओकडून सांगण्यात आले आहे.

# ठाणे ग्रामीण पोलीसांचा डिजिटल उपक्रम !

## डिजिटल उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : ठाणे ग्रामीण पोलिसांच्या वतीने डिजिटल उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. नागरिकांसाठी सुलभ, जलद आणि पारदर्शक सेवा मिळवण्याच्या उद्देशाने हा महत्त्वाचा डिजिटल उपक्रम राबविला आहे. यामध्ये नागरिक ठाणे ग्रामीण पोलीसांची अधिकृत वेबसाईट तसेच व्हाट्सअप बोट वापरून आरटीएस (राईट टू सर्व्हीस ) अंतर्गत विविध सेवा घरबसल्या मिळवू शकतात. यामध्ये घरबसल्या सेवा, जलद आणि सोपी प्रक्रिया, सुरक्षित व्यवहार, वेळेची बचत या डिजिटल सुविधांचे फायदे असणार आहेत अशी माहिती शहापूर, वासिंद पोलिस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेकडून देण्यात आली.

दरम्यान, या अंतर्गत उपलब्ध सर्व सेवा महाराष्ट्र शासनाच्या "आपले सरकार" पोर्टलशी संलग्न असून अधिक माहिती व सेवा घेण्यासाठी आपले सरकार (आरटीएस) पोर्टल या डिजिटल उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्या आणि अधिकृत वेबसाईट व व्हाट्सअप बोट वापरावे असे आवाहन शहापूर, वासिंद पोलिस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेकडून करण्यात आले आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| | https://x.com/Jeevandeepvarta |
| | https://jeevandeepvarta.com/ |

## भविष्यवेध



शुक्रवार
०९ जानेवारी २०२६

**मेष**
प्रलंबित असलेली कामे पूर्ण होतील. भविष्यातील योजनांवरही विचार करू शकता. ध्येय साध्य करण्यासाठी कुटुंबियांकडून मदत देखील मिळेल.

**वृषभ**
तुम्हाला काही नवीन गुंतवणुकीच्या संधी मिळू शकतात. नियोजन आणि मोठा निर्णय घेण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. सर्व जबाबदाऱ्या ओळखाल.

**मिथुन**
नवीन कामे स्वीकारण्याचा मोह होईल. व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. काम अत्यंत काळजीपूर्वक करा आणि गरजूंना शक्य तितकी मदत करा.

**कर्क**
नोकरी बदलण्याचा निर्णय घेऊ शकता. यासाठी तुम्हाला चांगले पर्याय सापडतील. ऑफिसमधील जुने काम पूर्ण करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल.

**सिंह**
तुम्ही ज्याला भेटाल तो तुमच्यामुळे प्रभावित होईल. बऱ्याच काळापासून सुरू असलेला कायदेशीर खटला आज तुमच्या बाजूने निकाली निघण्याची शक्यता आहे.

**कन्या**
एखाद्या ठिकाणी फिरायला जाल, निसर्गाचा आनंद घ्याल. आर्थिकदृष्ट्या, जुन्या मौल्यवान वस्तूंसाठी सौदेबाजी करणे फायदेशीर ठरेल.

**तुळ**
योजना बदलू शकतात. तुमच्या व्यवसायात काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करण्यास तुम्ही उत्सुक असाल. तुमच्या हृदयापेक्षा मनाचा वापर करा.

**वृश्चिक**
ज्येष्ठांचा सल्ला घेणं फायदेशीर ठरेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. सामाजिक कल्याणाकडे तुमचा कल वाढेल. तुमच्या शत्रूंपासून सावध रहा.

**धनु**
राजकीय कार्यात तुमची आवड वाढेल. आज शेजाऱ्यांमध्ये तुमचा आदर वाढेल. शैक्षणिक स्पर्धांमध्ये तुम्ही यशस्वी व्हाल. शत्रूंपासून सावध रहा. वरिष्ठ

**मकर**
कामाची प्रशंसा करतील. तुम्हाला पगार वाढ देखील मिळू शकते, ज्यामुळे आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला राहील. वरिष्ठांशी चांगला दृष्टिकोन ठेवा.

**कुंभ**
सामाजिक कार्यात योगदान द्याल. कामात अपेक्षित यश मिळेल. आज लांबचा प्रवास टाळा; हा निर्णय तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मीन**
एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळू शकते. मुलाच्या करिअरबद्दल चिंता कायम राहतील, परंतु तुमचा सल्ला दिलासा देईल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता






# ठाण्यात युती का? फडणवीसांनी उलगडली राजकीय गणिते



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण पुन्हा एकदा हालचालींनी तापले आहे. काही ठिकाणी मोठ्या पक्षांनी युतीचा मार्ग स्वीकारला आहे, तर काही शहरांत स्वबळाचा प्रयोग सुरू आहे. अशा परिस्थितीत ठाणे महानगरपालिकेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले स्पष्ट आणि आत्मपरीक्षणात्मक विधान महत्त्वाचे ठरते. ठाण्यात भाजप स्वतंत्रपणे लढू शकतो, नगरसेवकांची संख्या वाढवण्याची संधी होती, अशी भावना पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये होती, हे फडणवीसांनी प्रामाणिकपणे मान्य केले. मात्र, तरीही शिवसेनेसोबत युती करण्याचा आणि जागावाटपात 'नमतं' घेण्याचा निर्णय का घेतला, यामागचे राजकीय व भावनिक गणित त्यांनी उघड केले. फडणवीस यांच्या मते, ठाणे ही दहा वर्षांनंतर होणारी निवडणूक असून यात दोन-तीन राजकीय पिढ्या एकत्र निवडणुकीला सामोऱ्या जात आहेत. अशा वेळी युती न करता स्वतंत्र लढा दिल्यास पक्षांतर्गत असंतोष, कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आणि नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता होती. सत्ता मिळवता आली असती, पण त्यातून मनभेद वाढले असते, हे फडणवीसांचे विधान त्यांच्या दीर्घकालीन राजकीय दृष्टिकोनाची साक्ष देते. ठाणे हे बाळासाहेब ठाकरे यांचे आवडते शहर राहिले आहे. त्या शहरात शिवसेना आणि भाजपमध्ये संघर्ष निर्माण होणे योग्य नाही, हा मुद्दा फडणवीसांनी भावनिक पातळीवर अधोरेखित केला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला सोबत घेऊन लढणे, कमी जागा स्वीकारूनही युती टिकवणे, हा निर्णय त्यांनी 'राजकीय परिपक्वता' म्हणून मांडला आहे. या विधानांतून भाजपची रणनीती स्पष्ट होते. पालिका निवडणूक ही केवळ नगरसेवकांची संख्या वाढवण्यापुरती मर्यादित नसून, भविष्यातील सत्ता-संतुलन, पक्षसंघटन आणि कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवण्याशी जोडलेली आहे. मुंबई प्रमाणेच ठाण्यातही युतीचा निर्णय योग्य असल्याचा विश्वास फडणवीसांनी व्यक्त केला असून, ठाण्यातील युती हा तत्कालिक फायदा-तोट्याचा नव्हे, तर दीर्घकालीन राजकीय स्थैर्याचा निर्णय असल्याचे फडणवीसांच्या वक्तव्यातून स्पष्टपणे दिसून येते.

## काँग्रेसच्या बंडखोराला ठाकरे गटाचा पाठिंबा
# भाईंदरमध्ये मविआतील विसंवाद उघड

**■ मविआतील विसंवाद उघड**

ठाकरे गट मविआतून बाहेर असला, तरी काँग्रेसच्या बंडखोराला पाठिंबा देणे म्हणजे आघाडीतील समन्वय पूर्णपणे तुटल्याचे स्पष्ट संकेत.

**■ स्थानिक राजकारण राष्ट्रीय आघाडीपेक्षा वरचढ**

भाईंदर प्रभाग ८ मध्ये वैचारिक आघाडीपेक्षा स्थानिक गणित महत्त्वाचे ठरले. जिंकण्याची शक्यता जिथे दिसली, तिथे ठाकरे गटाने व्यावहारिक भूमिका घेतली.

**■ काँग्रेससाठी धोक्याची घंटा**

बंडखोरी + बाहेरून मिळणारा पाठिंबा = अधिकृत उमेदवाराची मते फुटण्याचा धोका. हा पॅटर्न इतर प्रभागांतही दिसू शकतो.

**■ ठाकरे गटाची 'स्ट्रॅटेजिक प्रेशर पॉलिटिक्स'**

स्वतःचे उमेदवार देऊनही अपक्षाला पाठिंबा म्हणजे काँग्रेसवर अप्रत्यक्ष दबाव ठेवण्याची खेळी.

**■ मतदारांचा कौल निर्णायक**

अनेक उमेदवार, आघाड्यांचा गोंधळ—शेवटी स्थानिक विश्वास आणि व्यक्तिगत प्रतिमा निर्णायक ठरणार.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर, ता. 8 :** मिरा–भाईंदर महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाने महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यानंतरही, काँग्रेसच्या बंडखोर उमेदवाराला दिलेला अधिकृत पाठिंबा हे स्थानिक राजकारणातील महत्त्वाचे वळण ठरत आहे. भाईंदर पश्चिमेतील प्रभाग क्रमांक ८ मध्ये ठाकरे गटाच्या या भूमिकेमुळे निवडणुकीतील समीकरणे पूर्णतः बदलली आहेत.

काँग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी व जिल्हा प्रवक्ता प्रकाश नागणे यांनी उमेदवारी नाकारल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. या बंडखोरीला मंगळवारी ठाकरे गटाने अधिकृत पाठिंबा जाहीर केल्याने काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारासमोर थेट ठाकरे गट–समर्थित अपक्ष उमेदवाराचे आव्हान उभे राहिले आहे. परिणामी, मविआतील अंतर्गत विसंवाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

महाविकास आघाडीतील जागावाटप फिसकटल्याने तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहेत. काँग्रेसने ९५ पैकी ३१ जागांवर उमेदवार दिले असले तरी काही प्रभागांत बंडखोरी उफाळून आली आहे. प्रभाग क्रमांक ८ मध्ये काँग्रेसकडून केवळ एकच उमेदवार देण्यात आल्याने असंतोष वाढला, त्याचा फायदा ठाकरे गटाने उचलल्याचे चित्र आहे. ठाकरे गटाने या प्रभागात आधीच एक पुरुष व एक महिला उमेदवार दिले असून, त्यातच नागणे यांना पाठिंबा दिल्याने मतविभाजनाची शक्यता वाढली आहे. यामुळे काँग्रेसची मते फुटण्याची, तर ठाकरे गटाचा अप्रत्यक्ष प्रभाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

एकूणच, प्रभाग ८ मधील ही घडामोड मविआतील समन्वयाच्या अभावाचे प्रतीक ठरत असून, स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणे किती वेगाने बदलू शकतात याचे ठळक उदाहरण मानले जात आहे. आगामी निकालात मतदार कोणाच्या बाजूने कौल देतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## नवी मुंबईतील एका प्रभागातील निवडणुकीला
# उच्च न्यायालयाची अंतरिम स्थगिती ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. प्रचाराची रणधुमाळी सुरू असतानाच नवी मुंबई महापालिकेतील प्रभाग क्रमांक १७(अ) च्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्याने निवडणूक प्रक्रियेत खळबळ उडाली आहे.

प्रभाग १७(अ) मधील भाजप उमेदवार निलेश भोजने यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळल्यानंतर भोजने यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या मालमत्तेवर अनधिकृत बांधकाम असल्याचा ठपका ठेवत महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या कलम १०(१)(ड) अंतर्गत अर्ज बाद करण्यात आला होता. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रथमदर्शनी मनमानी व बेकायदेशीर पद्धतीने अधिकारांचा वापर केल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने भोजने यांना दिलासा दिला असून, पुढील आदेश येईपर्यंत या प्रभागातील निवडणुकीला अंतरिम स्थगिती दिली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी होणार आहे.

दरम्यान, भोजने यांचा अर्ज बाद झाल्यानंतर भाजपने रणनीती बदलत अपक्ष उमेदवार दर्शन भोईर यांना पाठिंबा दिला होता. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर दर्शन भोईर यांनी पक्षाच्या विचारधारेनुसार काम करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, प्रभागात शिवसेना (शिंदे गट) उमेदवारांविरोधात थेट लढत रंगली आहे. मात्र, न्यायालयीन स्थगितीमुळे आता या प्रभागातील पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# ठाणे महापालिकेत कोट्यधिश उमेदवारांची लढत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू झाली असून, या निवडणुकीत एकूण ६४९ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. उमेदवारांनी सादर केलेल्या शपथपत्रांनुसार त्यापैकी ११४ उमेदवार कोट्यधीश असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, या कोट्यधीश उमेदवारांमध्ये शिंदे शिवसेनेच्या उमेदवारांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पत्नी परिषा सरनाईक या या निवडणुकीतील सर्वाधिक संपत्ती असलेल्या उमेदवार ठरल्या असून, त्यांच्या शपथपत्रात एकूण ३८१ कोटी रुपयांची मालमत्ता नमूद करण्यात आली आहे. तर दुसरीकडे, मुंब्रा येथील शरद पवार गटाचे उमेदवार खांचे मोहम्मद जैद अतिक खांचे यांचे वार्षिक उत्पन्न केवळ २० हजार ५०२ रुपये असल्याचे शपथपत्रात नमूद असून, ते सर्वात कमी उत्पन्नाचे उमेदवार ठरले आहेत. शिंदे सेनेचे उमेदवार बाबाजी पाटील यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात १२६ कोटी ६६ लाख रुपयांची मालमत्ता दर्शविली आहे. कळवा येथील तरुण उमेदवार मंदार कोणी यांच्या नावावरही १०५ कोटी रुपयांची संपत्ती असल्याचे उघड झाले आहे.

### अपक्ष उमेदवारही कोट्यधीश

अपक्ष उमेदवारांमध्ये प्रमिला केणी (६१.६८ कोटी), कविता पाटील (५५.८२ कोटी),विकास दाबाडे (२२.०८ कोटी), लॉरेन्स डिसोझा (१६.२७ कोटी), भूषण भोईर (१४.६८ कोटी) यांचा समावेश आहे. ठाणे महापालिका निवडणुकीत एकीकडे लोकप्रतिनिधित्वाचा दावा केला जात असताना, दुसरीकडे उमेदवारांच्या शपथपत्रातून संपत्तीतील मोठी तफावत समोर येत असल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

### भाजप, उद्धव सेना, राष्ट्रवादी, मनसेतील कोट्यधीश

भाजपकडून स्नेहा आंब्रे (१६.२० कोटी), अमित सरय्या (२६.२२ कोटी), भरत चव्हाण (१६.६७ कोटी), प्रतिभा मढवी (४३.५७ कोटी), नंदा व कृष्णा पाटील (५१.२० कोटी) हे कोट्यधीश उमेदवार आहेत. उद्धव ठाकरे गटाकडून महेश्वरी तरे (२३.४४ कोटी), नंदिनी विचारे (४१.८७ कोटी), रोहिदास मुंडे (१६.२२ कोटी) तर अजित पवार गटाचे नजीब मुल्ला (९.५३ कोटी) आणि शरद पवार गटाचे हिरा पाटील (२१.०९ कोटी) अशी मालमत्ता दाखविण्यात आली आहे. मनसेच्या रेश्मा पवार यांनी १७.७८ कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली आहे.

# महापालिकांचा महासंग्राम

# पक्षविरोधी कारवायांचा ठपका

## भाजपचे दोन बंडखोर निलंबित

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर, ता. ८ (बातमीदार) :** मिरा–भाईंदर महानगरपालिका निवडणुकीत भाजपमधून माजी नगरसेवकांसह काही पदाधिकाऱ्यांनी बंडखोरी केल्याचे चित्र असतानाही पक्षाकडून केवळ दोन जणांवरच कारवाई करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. उमेदवारी न मिळाल्यामुळे भाजपच्या नऊ माजी नगरसेवकांसह काही पदाधिकाऱ्यांनी बंडखोरी केली आहे. त्यामध्ये काशीमिरा येथील माजी नगरसेवक अनिल भोसले यांचा समावेश असून त्यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवाराविरोधात प्रभाग क्रमांक १४ मधून निवडणुकीत उडी घेतली आहे. ही कृती पक्षविरोधी व शिस्तभंग करणारी असल्याचा ठपका ठेवत भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप जैन यांनी अनिल भोसले यांना पक्षातून निलंबित केल्याचे पत्र दिले आहे. तसेच, भाजपच्या पदाधिकारी कविता भोये यांनाही निलंबित करण्यात आले आहे. भोसले आणि भोये हे दोघेही भाजपच्या अधिकृत उमेदवाराविरोधात प्रचार करताना पक्षाचे नाव व चिन्ह वापरत असल्याने ही कारवाई करण्यात आल्याचा खुलासा जिल्हाध्यक्ष दिलीप जैन यांनी केला. भोसले यांनी यापूर्वीही बंडखोरी केली होती. २०१२ मध्ये भाजपकडून निवडून आलेल्या भोसले यांना २०१७ मध्ये उमेदवारी नाकारण्यात आली होती. त्या वेळी त्यांनी बंडाचा पवित्रा घेतला होता; मात्र पक्षश्रेष्ठींनी समजूत काढून त्यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त केले होते.



## ठाकरेंचा
# भाजपावर हल्लाबोल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका येत्या १५ जानेवारी रोजी होणार असून प्रचाराची रणधुमाळी रंगली आहे. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आले असताना, भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची युती निवडणूक लढवत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजपवर तीव्र शब्दांत टीका केली आहे.

एका मराठी वृत्त वाहिनीवरील विशेष मुलाखत कार्यक्रमात बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, "निवडणूक योग्य पद्धतीने व्हावी, ही आमची अपेक्षा आहे. पूर्वी चोर चोर म्हटले की चोर पळून जायचा. आता चोरच अभिमानाने सांगतो की तो चोर आहे. अशी विचित्र परिस्थिती महाराष्ट्रात कधीच नव्हती. राज्याच्या राजकारणात सुसंस्कृतपणा होता; मात्र आता राजकारणाचे विद्रुपीकरण झाले आहे."

भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले, "भाजप हा हिंदुत्ववादी पक्ष नाहीच; तो सत्तावादी पक्ष आहे. जनसंघ संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शेवटी सहभागी झाला आणि सर्वात आधी बाहेर पडला. भाजपाचा डीएनए संधीसाधूपणाचा आहे. सत्तेसाठी कुणाशीही युती करायला ते तयार आहेत." पुढे बोलताना त्यांनी भाजपाची तुलना "पेशीय अमिबा" शी करत, "त्यांना सगळेच पाहिजे, हिंदुत्वाशी त्यांचा काहीही संबंध नाही. एमआयएमसोबत अकोटमधील युती म्हणजे भाजपाचा 'लव्ह जिहाद' आहे," असा आरोप केला. तसेच, "भाजपचे मंत्री गोमांस खातात आणि आम्हाला हिंदुत्व शिकवतात. महापालिका निवडणुकीत हिंदू–मुस्लिम हा मुद्दाच नाही," असेही उद्धव ठाकरे म्हणाले. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

### मराठी माणसांवर दादागिरी

मुंबईमधे गेल्या दोन ते तीन वर्षांत मराठी माणसांवर दादागिरी सुरु झाली. देशातलं एक राज्य दाखवा जिथे मराठी माणूस दादागिरी करतो आहे. घर नाकारलं जातं, आहारावरुन ऐकावं लागतं आहे. जो मराठी माणूस जिथे गेला तिथला बनून राहिला आहे. आमच्याच घरात येऊन आमच्यावर दादागिरी करायला लागले आहेत; यांचे शेठ दिल्लीत बसले आहेत म्हणून यांची मस्ती वाढली आहे असंही ठाकरेंनी म्हटलं आहे.

## दुसऱ्यांच्या हाती सत्ता दिल्यास पनवेलकरांच्या हाती भोपळा
### - पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल -** देशात व राज्यात सत्तेत असल्याने पनवेल महापालिकेची सत्ता दुसऱ्यांच्या हाती देऊन भोपळा करणार का असा प्रश्न कळंबोलीकरांसमोर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडला. तसेच दुसऱ्यांच्या हाती सत्ता दिल्यानंतर कोणी गरीबांचा, मध्यवर्गीय, शहर व खेड्यांचा सर्वांगीण विकासाचा विचार करणार नाही असेही त्या म्हणाल्या. मंत्री मुंडे या पनवेल महापालिकेच्या निवडणूकीत भाजप महायुतीच्या उमेदवारांना निवडणूक देण्याचे आवाहन करण्यासाठी कळंबोली उपनगरात बुधवारी सायंकाळी आल्या होत्या. त्यावेळी रोडपाली येथील बस आगाराच्या नियोजित जागेवर त्यांची चौकसभा पार पडली. यावेळी आ. प्रशांत ठाकूर, विक्रांत पाटील व प्रभाग क्रमांक ७,८,९ आणि १० येथील महायुतीचे सर्व उमेदवार उपस्थित होते.





# ज्येष्ठ पत्रकार सुनील इंगळे यांचा पत्रकार दिनानिमित्त गौरव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता** /नवी मुंबई : विविध विषयावरचे समाजाभिमुख व लोकाभिमुख विषयावर लेखणी द्वारे व्यक्त होणारे व परखड लेखनात विविध पुरस्कार प्राप्त करणारे ज्येष्ठ पत्रकार श्री.सुनील इंगळे यांचा पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र ने आयोजित केलेल्या सहा जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधून मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष व कामगार नेते महेंद्र शेठ घरत, समितीचे अध्यक्ष डॉ.अशोक म्हात्रे,सचिव डॉ.वैभव पाटील पत्रकार उत्कर्ष समितीच्या महिला कमिटी अध्यक्षा श्रीमती स्मिता पाटील, श्रीमती आरती पाटील व प्रा.अक्षय पाटील इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.या विशेष समारंभांमध्ये ठाणे,रायगड, नवी मुंबई व महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या पत्रकार व संपादकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### सारा तेंडुलकरच्या हस्ते
## खारघरमध्ये पीएनजी लाईफस्टाईलचे उद्घाटन



**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**
**कल्याण** : हाऊस ऑफ पीएनजी अंतर्गत आधुनिक आणि वजनाने हलक्या दागिन्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या 'लाइटस्टाईल बाय पीएनजी ज्वेलर्स'ने नवी मुंबईतील खारघर येथे आपल्या नवीन स्वतंत्र स्टोअरचे उद्घाटन करून विस्तार प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. फॅशन आयकॉन सारा तेंडुलकर हिच्या हस्ते या भव्य दालनाचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याप्रसंगी बोलताना सारा तेंडुलकर म्हणाली की, लाइटस्टाईल ब्रँड आजच्या काळातील महिलांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे आणि दैनंदिन वापरासाठी सोयीस्कर ठरतील असे दागिने उपलब्ध करून देतो. फाइन ज्वेलरी अधिक सहज आणि उपयुक्त बनवणाऱ्या या ब्रँडच्या प्रवासाशी जोडले गेल्याबद्दल तिने आनंद व्यक्त केला. तसेच, खारघर हे वेगाने विकसित होणारे क्षेत्र असून येथील आधुनिक जीवनशैली जपणाऱ्या ग्राहकांशी थेट संवाद साधण्याच्या उद्देशाने हे स्टोअर सुरू केल्याचे लाइटस्टाईलचे मार्केटिंग व ई-कॉमर्स हेड हेमंत चव्हाण यांनी स्पष्ट केले.

या विशेष प्रसंगी ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर जाहीर करण्यात आली आहे. लाइटस्टाईल ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर ५० टक्क्यांपर्यंत सूट दिली जात असून, ही सवलत ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वैध असणार आहे. परंपरेला आधुनिक सौंदर्याची जोड देत, किफायतशीर किमतीत उच्च दर्जाचे दागिने उपलब्ध करून देणे हा यामागील मुख्य हेतू आहे.

## मानाच्या पैठणीच्या मानकरी ठरल्या अनिता चव्हाण

### खालापूर येथे शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन



**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**
**पेण** : प्राथमिक शिक्षक वर्धापन दिनानिमित्त खालापूर तालुक्यात महिला भगिनींसाठी कोण जिंकणार पैठणी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये 27 महिला भगिनींनी सहभाग घेतला होता अत्यंत अतितटीच्या आणि चुरशीच्या स्पर्धेमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत कोण जिंकेल याची उत्सुकता सर्व तालुक्यातील शिक्षक बंधू भगिनींना लागली होती.मात्र शेवटच्या क्षणी काही सेकंदामध्ये पैठणी विजेती अनिता चव्हाण ठरल्या तर उपविजेती तृप्ती ताठरे या झाल्या.टॉप थ्रीमध्ये सुवर्णा घोडके, मनीषा सानप पल्लवी चौलकर या महिला भगिनीं आल्या . खेळ पैठणीचा यांचे उत्कृष्ट निवेदन अजित हरवडे यांनी केले.

तसेच महिला शिक्षिकांसाठी संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये प्रथम क्रमांक सौ.कांचन कडू द्वितीय क्रमांक सौ. सुगीता गवळी तर तृतीय क्रमांक जयश्री सुर्वे यांना मिळाला. तर शिक्षकांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये विजेता केंद्र आत्करगाव तर उपविजेता वावर्ले केंद्र ठरला तृतीय क्रमांक केंद्र देवन्हावे ठरला,उत्कृष्ट फलंदाज मधु पारधी ,उत्कृष्ट गोलंदाज दादासाहेब मुंजाळ मालिकावीर योगेश बिरादार या सर्व विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सदर स्पर्धा मंगल मुर्ती मैदान, कलोते मोकाशी येथे घेण्यात आल्या. शिक्षक संघ वर्धापन दिन ०७ जानेवारी २०२६ रोजी खालापूर तालुक्यातील शिक्षकांचे क्रिकेट सामने व महिला भगिनींसाठी खेळ पैठणीचा संगीत खुर्ची तसेच विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उदघाटन संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष हिरा भोपी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विक्रम त्रिवेदी ट्राय अँड श्रेयस फाउंडेशनचे विक्रम त्रिवेदी ,सौ भावना त्रिवेदी (अध्यक्ष इनरव्हील क्लब बॉम्बे पियर)शिल्पा दास वरिष्ठ विस्तार अधिकारी नंदा मोहिते केंद्रप्रमुख संघटना अध्यक्ष, खालापूर शिक्षक नेते उमेश विचारे दिलिप देशमुख संतोष पाटील हेमंत म्हात्रे, जयंत पाटील, पत्रकार धनाजी घरत राजन पाटील, मनोहर म्हात्रे,तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख, साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, सेवा निवृत्त शिक्षक बंधु-भगिनी तसेच तालुक्यातील संघटना प्रेमी शिक्षक वर्ग प्राथमिक शिक्षक संघ शाखा, खालापूर अध्यक्ष दिपक पालकर कार्याध्यक्ष मारुती दासरे सरचिटणीस धनाजी थिटे सहकार्याध्यक्ष बाळू भालसिंग संतोष निघोट उपाध्यक्ष सचिन कडू, सहचिटणीस पांडूरंग काळे जगदिश मोहने, खजिनदार विठ्ठल देशमुख सह खजिनदार किरण धारणे, हनुमंत गाडे आदि खालापूर तालुक्यातील शिक्षक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उल्हासनगर महापालिका निवडणुकीसाठी अधिकाऱ्यांची आढावा बैठक

## पारदर्शक व निर्भय निवडणुकीचे निर्देश



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025–26 च्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेश, परिपत्रके व निर्देशांनुसार तसेच आदर्श आचारसंहितेच्या तरतुदींनुसार निवडणूक प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत, पारदर्शक, निष्पक्ष व निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या उद्देशाने आज दिनांक 07 जानेवारी 2026 रोजी मुख्य निवडणूक निरीक्षक श्री. निलेश गटणे व निवडणूक निरीक्षक श्री. रविंद्र ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये निवडणूक प्रक्रियेतील सर्व महत्त्वाच्या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये मतदान प्रक्रिया, मतदान केंद्रांचे व्यवस्थापन, स्ट्राँग रूमची सुरक्षा व्यवस्था, मतदान साहित्याचे वितरण व स्वीकृती, मतदान पथकांची नियुक्ती, मॉक पोलची अंमलबजावणी, मतदान केंद्रांची सज्जता, मतदान प्रतिनिधी (एजंट) यांचे अधिकार व मर्यादा तसेच प्रभाग रचना आदी बाबी निश्चित केलेल्या नियमावलीनुसार काटेकोरपणे राबविण्याचे आणि त्यासाठी सूक्ष्म व परिणामकारक नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

यावेळी विशेषत्वाने असे आदेश देण्यात आले की, कोणत्याही उमेदवार, राजकीय पक्ष अथवा लोकप्रतिनिधींनी नियुक्त केलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना मतदान केंद्र परिसर, मतदान कक्ष अथवा मतमोजणी कक्षात प्रवेश देण्यास सक्त मनाई राहील, असे स्पष्ट करण्यात आले.

मतदारांना मतदानासंबंधी अधिकृत, प्रमाणित व सुलभ माहिती एका ठिकाणी उपलब्ध व्हावी, यासाठी महानगरपालिकेमार्फत अधिकृत ऑनलाईन माहिती प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर प्रणालीचा औपचारिक शुभारंभ दिनांक 06 जानेवारी 2026 रोजी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आला.

या अधिकृत ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राचा अचूक पत्ता, तेथे पोहोचण्यासाठी मार्गदर्शन करणारा नकाशा (GPS Location), मतदार यादीतील भाग क्रमांक व अनुक्रमांक, वैयक्तिक तपशील, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे (Affidavits) तसेच प्रभाग रचना इत्यादी सर्व आवश्यक माहिती सहज उपलब्ध होणार आहे. या सुविधेमुळे मतदारांना आता प्रत्यक्ष 'व्होटर स्लिप'वर अवलंबून राहण्याची आवश्यकता भासणार नाही, असे यावेळी नमूद करण्यात आले.

तसेच, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने, निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिनांक 14, 15 व 16 जानेवारी 2026 रोजी मद्यविक्रीची सर्व दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी मुख्य निवडणूक निरीक्षक श्री. निलेश गटने, निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.), निवडणूक निरीक्षक श्री. रविंद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस, निवडणूक निर्णय अधिकारी श्री. बाळासाहेब तिडके, श्री. गणेश सांगळे, श्री. विशाल जाधवर, श्री. विजयकुमार वाकोडे,श्री. मुकेश पाटील,श्री.संजय शिंदे, महापालिकेच्या उपायुक्त (निवडणूक) श्री. विशाखा मोटघरे, उपायुक्त (मुख्यालय) डॉ. दिपाली चौगले, उपायुक्त श्रीम. स्नेहा करपे, श्री. अनंत जवादवार, मुख्य लेखा अधिकारी श्री. किरण भिलारे, सहा. आयुक्त श्री. गणेश शिंपी व इतर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

# कल्याणातील कॅप्टन ओक हायस्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण** : कल्याणातील बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दि.२ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष मा.श्री. रमेश पुंडलिक गोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून नॅशनल उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक मा.श्री. अब्दुल्ला खान तसेच कॅप्टन ओक हायस्कूलचे मुख्याध्यापक मा. दिलीप सलाबत तडवी, पर्यवेक्षक मा. श्री. पंढरीनाथ बाविस्कर व ज्येष्ठ शिक्षक मा.श्री. उत्तम गायकवाड सर तसेच पालक-शिक्षक संघाच्या अध्यक्षा मा.सौ. गायकवड मॅडम व सहसचिव मा.श्री. अप्पासाहेब शिंदे उपस्थित होते.

वार्षिक पारितोषिक वितरणाच्या वेळी सन.२०२५-२०२६ मधील विविध स्पर्धा, उपक्रम, कार्यक्रम आणि शैक्षणिक कार्याचा आढावा पी. पी.टी. च्या माध्यमातून घेण्यात आला. यावेळी पी .पी.टी.च्या माध्यमातून शाळेच्या कार्याचा आढावा घेताना शाळेतील शिक्षिका मा.सौ. अमिता पाठक यांनी आपल्या सुमधुर आवाजातून पी.पी.टी.चे अप्रतिम असे सादरीकरण केले. तसेच पी.पी.टी. सादरीकरणाचे तांत्रिक काम शाळेतील मा.श्री. रमाकांत सोनवणे सरांनी अप्रतिम असे पार पाडले. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री.दिलीप तडवी यांनी प्रास्ताविक सादर केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात अप्रतिम अशी पी.पी.टी. बनविल्याबद्दल शिक्षकांचे विशेष कौतुक केले. यानंतर संस्था पातळी व ठेवीदारांनी ठेवलेल्या पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित ठेवेदारांचाही शाळेतर्फे सत्कार करण्यात आला.यानंतर सन.२०२५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी ठरलेल्या कु.ओवी मिलिंद कुलकर्णी, अथर्व हेमांग जोशी व कु. चारुता सुनील राणे या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. शालांत परीक्षेत प्रथम आलेल्या कु. ओवी मिलिंद कुलकर्णी या विद्यार्थिनीला रू.१०००० /-हून अधिक रक्कम बक्षीसाच्या स्वरूपात मिळाली.

यानंतर गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये इ.५वी,ते इ.९वी. मधील वार्षिक परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या आणि प्रत्येक विषयातील प्रथम व द्वितीय ठरलेल्या विद्यार्थ्यांना ठेविदारांनी ठेवलेल्या रकमेतून पारितोषिके देण्यात आली.तसेच शाळेत शारदोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये बक्षीसपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे मा.श्री. अब्दुल्ला खान यांनी उपस्थितीत विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले आणि बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले. तसेच कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लाभलेले मा.श्री. रमेश गोरे यांनीही अमूल्य असे मार्गदर्शन करून बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले आणि शाळेच्या कामकाजाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतुक केले.

शाळेच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचलन सौ.अमिता पाठक यांनी तर आभाराचे काम पर्यवेक्षक मा.पंढरीनाथ बाविस्कर यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.

# भिवंडीत शस्त्रांसह मद्यधुंद तरुणांचा गोंधळ

## पोलिसांनी 26 जणांना ताब्यात घेतले आचार संहिता पथका ऐवजी पोलिसांनी केला गुन्हा दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी** : भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक निमित्ताने शहरात आदर्श आचारसंहिता लागू असूनही शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिरासमोर सार्वजनिक ठिकाणी मध्यरात्री दरम्यान २६ तरुण युवक मद्यधुंद अवस्थेत जमून त्यांनी शस्त्रे बाळगल्याबद्दल आणि लोकांमध्ये दहशत पसरवल्या प्रकरणी निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींमध्ये भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील तरुण युवकांचा समावेश असून ते रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कोणासाठी जमा झाले होते ? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. तसेच ते कोंबडपाडा परिसरात कोणता गुन्हा करण्यासाठी आले होते याबाबत उलटसुलट चर्चा सुरु झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडील शस्त्र जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली.वास्तविक शहरात अशा प्रकारच्या दहशतीचे वातावरण निर्माण करण्याच्या घटना घडत असताना महापालिका निवडणूक विभागाचे आचारसंहिता पथक काय करते? अशा प्रकारची विचारणा शहरातील मतदार नागरिकां कडून केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ६ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२:३० वाजताच्या सुमारास भिवंडीच्या कोंबडपाडा परिसरातील गावदेवी मंदिरासमोर आणि आजूबाजूला काही तरुण मद्यधुंद स्थितीत जमले आणि त्यांनी गोंधळ घातला. याची माहिती मिळताच निजामपूरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे हे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले असता त्यांना २६ जण तरुण-युवक आरोपी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले. त्यांच्याकडे दोन जुनी वापरती तलवारी आढळून आल्या. आरोपींच्या कृतींमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.शहरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू आहे. अशा वेळी परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारे जमाव जमविण्यास सक्त मनाई आहे. असे असूनही, आरोपींनी बेकायदेशीरपणे जमून केवळ मनाई आदेशांचे उल्लंघन केले नाही तर पोलिस प्रशासनाने जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उघडपणे उल्लंघन केले. निजामपुरा पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ पोहोचून कारवाई करीत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यामध्ये भिवंडी, कल्याण आणि आसपासच्या परिसरातील रहिवासी समाविष्ट आहेत. तसेच पोलिसांनी घटनेत वापरलेली लोखंडी शस्त्रे देखील जप्त केली. सदर आरोपी कोणाच्या इशाऱ्याने या ठिकाणी आले ? याचा तपास आचारसंहिता अधिकाऱ्यांनी पोलिसांमार्फत करावा,अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.






# लोकमान्यनगर, वागळे परिसरात मतदानाबाबत व्यापक जनजागृती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे (08)** : ठाणे महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप (SVEEP) उपक्रमांतर्गत शहरातील विविध प्रभाग समित्यांमध्ये व्यापक मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

लोकमान्य सावरकर प्रभाग समिती अंतर्गत बुधवारी यशोधन इंग्लिश स्कूल यांच्या वतीने चैती नगर विभागात भव्य मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली शास्त्री नगर चौक ते शाळा या मार्गावर काढण्यात आली. या रॅलीत शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले




### स्वीप (SVEEP) उपक्रमांतर्गत शहरातील विविध प्रभाग समित्यांमध्ये व्यापक मतदार जनजागृती

होते. "प्रत्येक नागरिकाने मतदान करावे" असा संदेश विद्यार्थ्यांनी घोषणांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविला.

वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक 16, 17 व 18 मधील शांतीनगर, श्रीनगर, रामनगर, डिसोजावाडी व शिवाजीनगर येथील शाळांमध्ये चित्रकला स्पर्धा आयोजित करून मतदान जनजागृती करण्यात आली.तसेच स्वीप पथकाने आरोग्य केंद्रांना भेट देत नागरिकांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगत जनजागृती केली.

तसेच उथळसर प्रभाग समिती अंतर्गत निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाचा टक्का वाढविण्याच्या उद्देशाने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.या अभियानाचा भाग म्हणून ठाणे महानगरपालिकेच्या विशेष पथनाट्य पथकाने उथळसर प्रभागातील रायगड आळी, गोकुळनगर, कोलबाड, चंदनवाडी येथील मुख्य चौक तसेच शाळा क्रमांक 07 येथे प्रभावी पथनाट्य सादर केले.या पथनाट्यातून मतदान न करण्याचे दुष्परिणाम, लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व व नागरिकांची जबाबदारी यावर प्रभावी संदेश देण्यात आला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024